## प्रेस नोट

दिनांक -२०/०८/२०१८.

### भुमि अभिलेख कार्यालय,ठाणे येथील अभिलेखपालावर लाचेची मागणी केल्यावरून गुन्हा दाखल

दिनांक २०/०८/२०१८ रोजी ठाणेनगर पोलीस स्टेशन, येथे भुमि अभिलेख कार्यालय, ठाणे येथील अभिलेखपाल **सुहास धवन** यांच्याविरूध्द् यातील तक्रारदार यांच्याकडे ५,५००/- रुपयांच्या लाचेची मागणी केल्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला. त्याबाबत थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे.

यातील तक्रारदार यांना भुमि सर्वेक्षणाचा नकाशा व गटबुकाचा उतारा देण्यासाठी यातील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे ५५००/- रुपये लाचेची मागणी केली होती. त्यापैकी १५००/- रुपये यापुर्वी लोकसेवक यांनी स्विकारले होते. उर्वरीत ४०००/- रुपये देणे बाकी होते. सदरबाबत तक्रारदार यांनी अेसीबी ठाणे येथे तक्रार नोंदविली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २०/०४/२०१८ व २४/०४/२०१८ रोजी पडताळणी केली असता वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरून अेसीबी, ठाणे यांनी सापळयाचे आयोजन केले परंतू नमुद लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारली नाही. म्हणून लोकसेवक **सुहास धवन** यांच्याविरूध्द लाचेची मागणी केल्यावरून ठाणेनगर पो.स्टे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढील तपास श्रीमती अंजली आंधळे, पोलीस उप अधीक्षक, अेसीबी ठाणे या करत आहेत.

**शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.**

---

१) टोल फ्री :- १०६४

२) दुरध्वानी क्रमांक :- ०२२/२५४२७९७९

३) ई-मेल आयडी :- spacbthane@mahapolice.gov.in

४) वोबसाईट :- www.acbmaharashtra.gov.in

Scanned by CamScanner